कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या संवर्गातील
कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या
पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/३६/२०२५
अहिल्यानगर दिनांक २२.०१.२०२५

वाचा- १.ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एपिटी/ प्र.क्र.१०००/
प्र.क्र.२०२५/आस्था-८ दिनांक ०५/०६/२००३
२.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील नियम ५(२)
परिशिष्ठ ११(३)
३.सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१८/प्र.क्र.१५९/का-१२
दिनांक ०१/०८/२०१९
४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब
दिनांक ०७/०५/२०२१
५. पदोन्नती समिती इतिवृत्त दिनांक २३/१२/२०२४

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचारी यांना वरिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदावर वेतनश्रेणी एस-०८ रुपये २५५००-८११०० मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन खालील रकाना क्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्रमांक ४ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार बिंदूविरहीत भरण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.पवार सचिन जगन्नाथ | पंचायत समिती कर्जत | ज्येष्ठतेनुसार बिंदूविरहीत | पं.स.श्रीगोंदा |

**अटि व शर्ती-**

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देणेत येत आहे.

२. शासन निर्णय दिनांक १/४/२०१०,दिनांक २/३/२०१९ व शासन परिपत्रक दिनांक २८/७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचा-यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

३. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

४.नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबधीत कार्यालय प्रमुखांनी वरिल कर्मचा-यांस पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे.कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने संबधीताने सदरचा आदेश प्राप्त झालेचे दिनांकापासुन ०७ दिवसाचे आंत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा ज्येष्ठता डावलली जाईल. तसेच सदरची पदोन्नती स्विकारत/नाकारत असलेबाबतचे लेखी पत्र संबधिताने त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत सात दिवसांत अर्थ विभाग,जि.प.अहिल्यानगर येथे सादर करावे.

६. सदरचे आदेशाची नोंद संबधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०९२२५०००३ असा आहे.

| | |
|---|---|
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | (आशिष येरेकर भाप्रसे)<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अहिल्यानगर |

प्रति,

श्री. श्री.पवार सचिन जगन्नाथ ,कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पंचायत समिती कर्जत

द्वारा व प्रत गट विकास अधिकारी,पंचायत समिती कर्जत, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर

प्रत- १. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

२. गटविकास अधिकारी पं.स. श्रीगोंदा

३. आस्थापना-२/अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

४. निवडनस्ती

| | |
|---|---|
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | (आशिष येरेकर भाप्रसे)<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद अहिल्यानगर |